## मालिका : सोळावं वर्ष धोक्याचं!

कुमारवय म्हणजे नैसर्गिक बहराचा काळ! हे उमलते वय म्हणजे आई–वडील आणि षिक्षकांच्या दृष्टीने 'लक्ष्य' साध्य होईपर्यंत भरपूर अभ्यास आणि कमीत कमी खेळ व मनोरंजन यापुरते असते, कारण त्यांना त्यांच्या मुलांच्या/विद्यार्थ्यांच्या भवितव्याची चिंता असते. चांगल्या क्रमांकांनी उत्तीर्ण होऊन प्रतिष्ठीत महाविद्यालयांत त्यांच्या मनाप्रमाणे अभ्यासक्रम मुलांना मिळावा हेच त्यांचे प्राथमिक ध्येय असते.

समाजाच्या दृष्टीने ही नवतरूणपिढी म्हणजे त्रासदायक आणि प्रचंड षक्ती असूनही भलत्या गोष्टींत खर्च करून वाया घालवणारी समजल्या जाते. पण वैद्यकषास्त्रानुसार हे कुमारवय म्हणजे हारमोन्समुळे होणा–या षारिरीक व मानसिक बदलाचे असते.

आपल्यापैकी ब–याच जणांच्या मनात येत असेल की, कुमारावस्थेतून काय आजकालचीच पिढी जाते आहे का? आपल्याला तर त्या काळात फारसा त्रास झाल्याचे आठवत नाही. पण आजच्या गतिमान युगात तारूण्याच्या उंबरठयावर उभे असलेले मुलं–मुली आणि त्यांचे आई–वडिल प्रचंड तणावात वावरताना आढळतात. आपली मुलं खूप षिकावीत, मोठी व्हावीत, आदर्ष म्हणवल्या जावीत असं प्रत्येकच पालकाचं स्वप्न असतं, पण कुठेतरी काहीतरी कमी पडतं आणि त्यांना वाटच हरवल्याचं जाणवतं.

तेव्हा वस्तुस्थिती ओळखून व्यवस्थित मार्ग काढता यावा, तसेच पाल्यांचे कुमारवय सुरळीत पार पडावे म्हणून पालकांसाठी आणि सर्वांसाठीच माहीती देणारी 'सोळावं वर्ष धोक्याचं!' ही काही लेखांची मालिका.